# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)**

**(महाविद्यालयीन विभाग)**

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)


जा.क्र./महा.वि./गो.वि./९८८ /२०१६
दिनांक : ०६/०९/२०१६

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– विधी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबत. श्री इरफान काझी
संदर्भ :– शासन पत्र उशिसं/२०१६/सीईटी/प्र.क्र.२०७/मशि–२/९४६४
दि.०९/०८/२०१६

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, बारावी उतीर्ण होवून विधी ५ वर्षिय अभ्यासक्रमात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विधी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर पडल्याने चालू शैक्षणिक वर्षासाठी इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घेवून ठेवलेले आहेत. विधी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाल्यानंतर सदर विद्यार्थी इतर अभ्यासक्रमातील प्रवेश रद्द करतील.

विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्व नियोजित वेळापत्रकापेक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द न करण्याबाबतचे घोषणापत्र सादर करण्याबाबत सक्ती करू नये. तसेच विधी पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना असे घोषणापत्र महाविद्यालयांस सादर करण्याबाबतची सक्ती करू नये. अथवा हा कालावधी विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात यावा. याबाबतची कार्यवाही सोबत संलग्नित पत्राच्या अनुषंगाने करण्यात यावी.

सहपत्र :– शासन पत्र सोबत संलग्नित

डॉ. एस.एम.रोकडे
संचालक (प्रभारी)
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी:– मा. संचालक, शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१


एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
फोन नंबर ०७१३२–२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

दिनाक 10.08.16
दिनांक 16.08.16

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web:www.dhepune.gov.in
E-mail : ped.dhepune@nic.in

फोन नं. ०२०/२६०५१७२९, २६१२२११९, २६०५१५१२, फॅक्स नं.०२०/२६१२११५३

क्रमांक उशिसं/२०१६/सीईटी/प्र.क्र.२०७/मशि-२ /८८६८ दिनांक ०९.०८.२०१६

प्रति,

१. कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे

विषय : विधी पदवी प्रवेश प्रक्रियेबाबत.
श्री.इरफान काझी

संदर्भ : शासन पत्र क्र.सीईटी-२०१६/प्र.क्र.२०७/मशि-२, दिनांक ०८.०८.२०१६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शासनाकडे प्राप्त झालेल्या निवेदनानुसार बारावी उत्तीर्ण होऊन विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी, विधी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर पडल्याने चालू शैक्षणिक वर्षासाठी इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन ठेवलेले आहेत. विधी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाल्यानंतर सदर विद्यार्थी इतर अभ्यासक्रमातील प्रवेश रद्द करतील.

राज्यातील विधी महाविद्यालयांच्या नोंदणी प्रक्रियेतील अडचणीमुळे विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया पूर्व नियोजित वेळापत्रकापेक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. ही बाब विचारात घेता आपल्या विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द न करण्याबाबतचे घोषणापत्र सादर करण्याबाबत सक्ती करुन नये. तसेच विधी पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना असे घोषणापत्र महाविद्यालयास सादर करण्याबाबतही सक्ती करु नये. अथवा हा कालावधी विधी ५ वर्षीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाढविण्यांत यावा.

( डॉ.धनराज माने )
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत : मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

आवक क्र. 300 दिनांक 9/8/16
जावक क्र. दिनांक

15/8/16
9/08/16